# फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाऊंडेशनने दिले विश्वासच्या स्वप्नांना पंख

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि आरोग्यसेवा, शिक्षण, समाज कल्याण आणि जलसंवर्धन या क्षेत्रात कार्य करणारी तिची सीएसआर भागीदार संस्था मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा रोवला गेला आहे. एमएमएफने आर्थिक आधार दिलेल्या आणि कायमस्वरूपी बहिरेपण, गरीब कुटुंबाची पार्श्वभूमी, दारिद्र्य यांच्याशी सामना करणाऱ्या विश्वास शिंदे याने फिनोलेक्स अ‍ॅकेडमी ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजीमधील अभियांत्रिकी परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने ७.७ सीजीपीए गुण मिळविले असून प्रथम श्रेणीसाठीच्या ६.७५ पेक्षा ते किंचित कमी आहेत.



चांदराई, रत्नागिरी येथील एका गरीब कुटुंबातील सामान्य विद्यार्थी असलेल्या विश्वासला दुर्दैवाने नववीत असताना मम्प्स अटॅकचा सामना करावा लागला. त्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. त्याने विशेष श्रेणी अंतर्गत शालांत परीक्षा ८०% गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनीयरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. त्याचे प्राध्यापक बेळवालकर यांनी त्याची समस्या ओळखून मोफत उपचारांसाठी अनेक डॉक्टर आणि संस्थांच्या निमंत्रकांकडे त्याला पाठवले. मात्र त्याला कॉक्लिअर इम्प्लांट उपचार आवश्यक असल्याचे निदान करण्यात आले आणि आणि त्याला डॉ. एम.व्ही. हिंदुजा हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. किर्तने यांच्याकडे पाठवण्यात आले. डॉ. कीर्तने यांच्या टीमचा भाग असलेल्या डॉ. शेखर कोवाले (माजी डीन फिशरीज कॉलेज, रत्नागिरी) यांची कन्या डॉ. क्षमा कोवाळे यांनी त्याला खूप मदत केली. डॉ. किर्तने यांनी एमएमएफला मदतीसाठी बोलावले. एमएमएफने नेहमीप्रमाणे कोणताही विलंब न लावता ५.५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यामुळे विश्वास शिंदे यांची श्रवणशक्ती पूर्ववत करण्यास मदत झाली.

एमएमएफने एक पाऊल पुढे जात त्याला मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये बी. ई. करण्यासाठी तीन वर्षे २०००० दरवर्षी देऊन त्याच्या शिक्षणाला प्रायोजित केले. मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया म्हणाल्या, फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि एमएमएफमध्ये आम्ही सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देतो. विश्वासचा आम्हाला अभिमान आहे. स्वतःच्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर विश्वासने सर्व कठीण आव्हानांवर मात करत अभियंता बनण्याचे स्वप्न साकार केले आहे. विश्वास शिंदे म्हणाले, फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने मला केवळ शस्त्रक्रियेसाठीच मदत केली नाही, शिक्षण पूर्ण करण्याचे माझे स्वप्न साकारण्यासाठीही आधार दिला.